" स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद " - कर्मवीर
रयत शिक्षण संस्थेचे ,

कार्यालय : (०२१६४) २७१३४६
निवास : (०२१६४) २७१७९४
ई-मेल - str.sgmck-@Sancharnet.in

**सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, विद्यानगर, कराड.**

पिन - ४१५ १२४ जि. सातारा (महाराष्ट्र) पो. ऑ. बॉ. नं. ३

**कला, विज्ञान व वाणिज्य (कनिष्ठ व वरिष्ठ) नॅक मानांकन : B+**

स्थापना : १९५४

(शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संलग्नित)

संस्थापक - **पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील,** डी. लिट.

प्राचार्य
**डॉ. एम. एम. राजमाने**
एम.एस्सी.पीएच.डी.

संदर्भ क्र. 302/07-08
दिनांक: 30-5-2007

# प्र मा ण प त्र

दाखला देण्यात येतो की. कु. मुळीक शुभांगी विष्णू ही या महाविद्यालयाची सन 2005–06 या वर्षात एम. फिल मराठी पदवी अभ्यासक्रमासाठी नियमित विद्यार्थिनी होती. तिने प्रतिमा इंगोले यांच्या कथांचा चिकित्सक अभ्यास ( 'सुगरणचा खोपा' आणि 'लेक भुईची' ) या विषयावर डॉ. सौ. कुलकर्णी सुलक्षणा दिलीप यांच्या मार्गदर्शनाखाली प्रबंधिका पूर्ण केली आहे. त्यांची प्रबंधिका एम. फिल परीक्षेसाठी स्विकारावी अशी मी शिफारस करीत आहे.

स्थळ: कराड
दि. 30/05/2007

SADGURU GADAGE MAHARAJ COLLEGE
KARAD

**प्राचार्य**
**स. गा. म. कॉलेज, कराड**

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, कु. मुळीक शुभांगी विष्णू हिने प्रतिमा इंगोले यांच्या कथांचा चिकित्सक अभ्यास ['सुगरणचा खोपा' आणि 'लेक भुईची'] ह्या विषयावरील प्रस्तुत प्रबंधिका एम्.फिल.(मराठी) पदवीसाठी माझ्या मार्गदर्शनाखाली सिध्द केली आहे.

तिने उपलब्ध साहित्याचा अभ्यास करून आपल्या विषयाची स्वतंत्रपणे मांडणी केली आहे. तिने केलेले हे संशोधन पूर्णपणे नवे आहे. सदर प्रबंधिकेचे काम पूर्णावस्थेत आहे व ती सादर करण्यास काहीही अडथळा नाही याची मला खात्री वाटते.

ही प्रबंधिका अथवा यातील कोणताही भाग पूर्णपणे स्वतंत्र असून यापूर्वी अन्य कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही. म्हणून ती सादर करण्यास मी अनुमती देत आहे.

स्थळ : कराड
दिनांक : २२/६/07

(डॉ. सौ. सुलक्षणा दि. कुलकर्णी)
मार्गदर्शिका

**Head,**
Dept. of Marathi
B.V's MBSK Kanya Mahavidyalaya
Kadegaon, Dist. Sangli.

# प्रतिज्ञापत्र

प्रतिमा इंगोले यांच्या कथांचा चिकित्सक अभ्यास ['सुगरणचा खोपा' आणि 'लेक भुईची'] ह्या विषयावरील सदरची प्रबंधिका मी शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल. (मराठी) पदवी परीक्षेसाठी लिहिली आहे. ही प्रबंधिका अथवा यातील कोणताही भाग पूर्णपणे स्वतंत्र असून यापूर्वी अन्य कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

स्थळ : कराड
दिनांक : २२।६।०७.

SMulik
(शुभांगी मुळीक)
संशोधक विद्यार्थी

# ऋणनिर्देश

प्रतिमा इंगोले यांच्या कथांचा चिकित्सक अभ्यास ['सुगरणचा खोपा' आणि 'लेक भुईची'] हा विषय एम्.फिल.च्या शोध प्रबंधासाठी निवडण्यामागे मराठी विभाग (शिवाजी विद्यापीठ) तसेच मार्गदर्शक डॉ. सौ. सुलक्षणा दिलीप कुलकर्णी यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करून विषय निश्चित केला गेला.

कडेगांवला कॉलेजमध्ये शिकत असताना प्रतिमा इंगोले यांचा 'सुगरणचा खोपा' हा कथासंग्रह आणि 'भुलाई' हा काव्यसंग्रह वाचला होता. तसेच टीव्ही वरती बातम्या पाहताना विदर्भातील शेतकऱ्यांची दयनीय अवस्था मी पहात होते. कर्जबाजारी झाल्यामुळे, पावसाच्या अभावामुळे शेतकरी राजा आत्महत्या करीत होता हे सर्व पाहून माझ्या मनात विदर्भातील लोकांविषयी जिव्हाळा निर्माण झाला आणि प्रतिमा इंगोले यांचा कथासंग्रह वाचल्यामुळे प्रतिमा इंगोले यांच्या कथासंग्रहाविषयी काहीतरी लिहावं असा विचार करीत होते आणि अभ्यासपूर्ण लिहिण्याची एम्.फिल. मुळे ही संधी मिळाली. मी हे दोन्ही कथासंग्रह निवडले. मार्गदर्शक डॉ. सौ. सुलक्षणा कुलकर्णी यांच्या सल्ल्यावरून या दोन्ही कथासंग्रहांचा चिकित्सक अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केला आहे.

'मराठी कथेची पार्श्वभूमी' आणि 'आधुनिक कथा आणि मराठीतील स्त्रीकथाकार' या दोन्ही प्रकरणांचा थोडक्यात आढावा घेतला आहे. प्रतिमा इंगोलेंचे व्यक्ती आणि वाङ्मय सविस्तर सांगण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच 'सुगरणचा खोपा' कथासंग्रहाचा परिचय करून देऊन वाङ्मयीन मूल्यमापन केले आहे आणि 'लेक भुईची' कथासंग्रहातील कथांचा परिचय करून वाङ्मयीन मूल्यमापन केले आहे. 'निष्कर्ष' या प्रकरणात एकूण सर्व प्रकरणांचा विचार मी माझ्या परीने केला आहे. शोध प्रबंधातील विवेचन, दोन्ही कथासंग्रहांचा चिकित्सक अभ्यास सर्वमान्य होईलच असे नाही. मात्र या ठिकाणी एका निखळ संशोधकाच्या भूमिकेतून प्रतिमा इंगोले यांच्या कथालेखनाचा चिकित्सक अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केला आहे. परिशिष्ठामध्ये प्रतिमा इंगोलेंचा परिचय, त्यांना मिळालेले पुरस्कार, प्रकाशित पुस्तके, इतरांनी केलेली परीक्षणे यांचा समावेश केला आहे.

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करताना विषयाची निवड करण्यापासून ते प्रबंधाला पूर्णत्व देण्यापर्यंत माझ्या आदरणीय व माननीय मार्गदर्शक डॉ. सौ. सुलक्षणा दिलीप कुलकर्णी, उपप्राचार्या व मराठी विभाग प्रमुख मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगांव यांनी केलेल्या मौलिक मार्गदर्शनामुळे स्व्त: घेतलेल्या कष्टामुळे, सहकार्यामुळे व वेळोवेळी प्रबंध पूर्ण करण्यासाठी दिलेल्या प्रेरणामुळे हा प्रबंध पूर्ण होऊ शकला. त्यांची सदैव ऋणी राहणे हे मी माझे सद्भाग्यच समजते.

शोधनिबंधाचा अभ्यास करताना माझी प्रिय मैत्रीण सविता माळी, दिपाली पाटील यांनी वेळोवेळी मदत केली. त्याबद्दल त्यांची मी अत्यंत आभारी आहे.

एम्.फिल. अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊन तो पूर्ण करण्यासाठी सहकार्य व प्रेरणा देणारे आदरणीय प्राचार्य राजमाने (सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड), प्राचार्य कणसे डी.जी. (मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगांव), डॉ. सुमन पाटील, मराठी विभाग प्रमुख प्रा. संभाजीराव देसाई (सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड), डॉ. सौ. दिवेकर मॅडम, डॉ. डी.आर. गायकवाड, प्रा. कृष्णा निर्मळे, कोल्हापूर, औरंगाबादच्या मिलींद कॉलेजचे माजी प्राचार्य लक्ष्मणराव रायमाने या सर्वांचे ऋण कधीही न फिटण्यासारखे आहेत.

तसेच प्रा. सौ. सुर्यमाला जाधव, प्रा. सौ. निकम मॅडम, प्रा. रमेश पोळ, प्रा. रैनाक मॅडम यांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाल्याबद्दल मी त्यांची सदैव ऋणी आहे.

माझे वडील श्री विष्णू नाना मुळीक, आई सौ. अनुसया विष्णू मुळीक, भाऊ श्री उमेश विष्णू मुळीक, चि. विशाल विष्णू मुळीक, बहीण सौ. सुजाता विठ्ठल साळुंखे आणि वहिनी सौ. मनिषा उमेश मुळीक या कुटुंबातील सर्व सदस्यांनी मला सतत प्रेरणा दिली.

एम्.फिल.चा अभ्यास पूर्ण करण्यासाठी आर्थिक मदत करणारे श्री. विष्णू नाना मुळीक (वडिल), श्री उमेश विष्णू मुळीक (भाऊ) या दोघांची मी सदैव ऋणी आहे.

शोध निबंधासाठी आवश्यक महत्त्वाची अशी संदर्भ पुस्तके मिळवून देण्यासाठी अनेकांनी सहकार्य केले. सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज कराडचे ग्रंथालय, मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगावचे ग्रंथालय इ. ठिकाणी उपलब्ध असलेल्या संदर्भ पुस्तकांचे मला अमोल सहकार्य लाभले. त्या सर्व ग्रंथपालांच्या सहकार्याबद्दल मी कृतज्ञ आहे. प्रस्तुत प्रबंधाची संगणकाद्वारे जुळणी करणाऱ्या ज्योती टायपिंगच्या सौ. सुनिता नांदेडकर यांचीही मी आभारी आहे.

यापुढेही या सर्वांचे सहकार्य मिळावे ही आशा बाळगते व सर्वांची ऋणी राहू इच्छिते.

**(शुभांगी मुळीक)**

# प्रास्ताविक

प्रतिमा इंगोले यांच्या कथांचा चिकित्सक अभ्यास ['सुगणचा खोपा' आणि 'लेक भुईची'] या विषयाचा अभ्यास करताना काही गोष्टींकडे कटाक्षाने लक्ष पुरविले आहे. त्या गोष्टी अशा :-

'मराठी कथेची पार्श्वभूमी' लिहित असताना लीळारित्रापासून ते नवकथेच्या सर्व प्रवाहांचे विवेचन केले आहे. १९६० नंतरची कथा, ग्रामीण व प्रादेशिक कथा आणि कथाकार, दलित कथा, विनोदी कथा, भय कथा, अद्भुत कथा, विज्ञान कथा, असित्ववादी कथा यांचाही सविस्तर आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

'आधुनिक कथा आणि मराठीतील स्त्री कथाकार' या प्रकरणाचा विचार करताना ताराबाई शिंदे यांच्यापासून ते लोकप्रिय मनोरंजक कथा, मनोविश्लेषणात्मक कुटुंबकथा, साठोत्तरी कथालेखिका, अस्तित्ववादी कथा, स्त्रीवादी कथा, ग्रामीण कथा, दलित कथा, विज्ञानकथा, पौराणिक, ऐतिहासिक कथा, लघुत्तम कथा आणि या सर्व कथेच्या प्रवाहाशी संलग्न असणाऱ्या कथालेखिकांचा थोडक्यात आढावा घेतला आहे. नवोदित ग्रामीण कथाकार प्रतिमा इंगोले यांचे वाङ्मयीन व्यक्तीमत्त्वनोंदविले आहे.

'प्रतिमा इंगोले व्यक्ती व वाङ्मय' या प्रकरणात प्रतिमा इंगोले यांचे बालपण, शिक्षण आणि एकूणच त्यांची जडणघडण कशी झाली याचा विचार करीत असतानाच त्यांची एकूण प्रकाशित पुस्तके, इतरांनी केलेली परीक्षणे, त्यांना मिळालेले विविध पुरस्कार, त्यांचे मराठी साहित्यातील स्थान आणि त्यांच्या एकूण वाङ्मयाचा विचार केला आहे.

'सुगरणचा खोपा' कथासंग्रहातील कथांचा परिचय करून त्याच्या वाङ्मयीन मूल्यमापनाकडे बारकाईने लक्ष पुरविले आहे. त्यात मुखपृष्ठ, मलपृष्ठ, रेखाचित्रे, स्त्रीचित्रण, पुरूषचित्रण, ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण, म्हणी, वाक्प्रचार, संवाद, भाषाशैली, उणीवा, निसर्गचित्रण, प्रतिमा व उपमा या वाङ्मयीन मूल्यमापनाचा उहापोह केलेला आहे.

'लेकीचं कर्तृत्व' कथासंग्रहातील कथांचा परिचय करून देऊन त्याचे वाङ्मयीन मूल्यमापन केले आहे. यामध्ये मुखपृष्ठाचे सौंदर्य, मलपृष्ठ, समर्पक शीर्षक, स्त्रीचित्रण,. पुरूषचित्रण, ग्रामीण समाजाचे वास्तव चित्रण, संवाद, म्हणी, वाक्यप्रचार, प्रतिमांचा वापर इंगोलेंच्या कथेचे वेगळेपण, लेखनाच्या मर्यादा, भाषा, वैदर्भीय शब्द इ. चिकित्सक अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केला आहे.

'निष्कर्ष' या प्रकरणात एकूण सर्व प्रकरणांचा थोडक्यात आढावा घेतला आहे.

परिशिष्टामध्ये डॉ. सौ. प्रतिमा इंगोले यांचा परिचय, त्यांची प्रकाशित पुस्तके, इतरांनी केलेली परीक्षणे आणि त्यांना मिळालेले पुरस्कार या बाबी नोंदविल्या आहेत.

प्रबंधिकेच्या शेवटी संदर्भग्रंथाची सूची दिली आहे. वरीलप्रमाणे शोधनिबंधात परिपूर्णता आणण्याचा मी कसोशीने प्रयत्न केला आहे.

# अनुक्रमणिका


| अ.नं. | प्रकरणाचे नांव | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | प्रास्ताविक | | |
| प्रकरण १ | मराठी कथेची पार्श्वभूमी | -- | १ ते १५ |
| प्रकरण २ | आधुनिक कथा आणि मराठीतील स्त्रीकथाकार | -- | १६ ते ३७ |
| प्रकरण ३ | प्रतिमा इंगोले व्यक्ती व वाङ्मय | -- | ३८ ते ५१ |
| प्रकरण ४ | 'सुगरणचा खोपा' या पुस्तकाचा परिचय व वाङ्मयीन मूल्यमापन | -- | ५२ ते ८२ |
| प्रकरण ५ | 'लेक भुईची' या पुस्तकाचा परिचय व वाङ्मयीन मूल्यमापन | -- | ८३ ते ११९ |
| प्रकरण ६ | निष्कर्ष | -- | १२० ते १२७ |
| | परिशिष्ट | -- | १२८ ते १३१ |
| | संदर्भसूची | -- | १३२ ते १३३ |